# भूमिगत मेट्रो टप्प्यात

## आरे कारशेड ९९ टक्के पूर्ण; अंतिम निरीक्षणासाठी लवकरच विशेष चमू येणार

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे. ही मार्गिका सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या आरे येथील बहुचर्चित कारशेडचे (गाड्या दुरूस्ती डेपो) काम ९९ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे. लवकरच अंतिम निरीक्षणाद्वारे या मार्गिकेतील गाड्या सज्ज होतील, असे सांगितले जात आहे.

आरे ते कफ परेड अशा उभ्या होणाऱ्या ३३ किमी व २७ स्थानकांच्या मेट्रो ३ या भूमिगत मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी असेल. वास्तवात हा टप्पा २०२१मध्येच सुरू होणार होता. मात्र आरेच्या जंगलातील जमिनीसंबंधी आंदोलने व न्यायिक वाद झाल्याने तो डिसेंबर २०२३पर्यंत पूर्ण करण्याचे ठरले. ही डिसेंबरची कालमर्यादा एप्रिल २०२४पर्यंत पुढे ढकलण्यात आली होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डिसेंबरची घोषणा केली होती तर ही मार्गिका उभ्या करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी एप्रिलची घोषणा केली होती. मात्र आता मे संपत आला तरिही मार्गिका सुरू होण्याची शक्यता नाही. मात्र आता या मार्गिकेची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

एमएमआरसीच्या संबंधित अधिकाऱ्यांनुसार, आरे येथील कारशेड ९९.५० टक्के झाले आहे. नियंत्रण कक्ष, गाड्या उभ्या करण्यासाठीचे १६ रूळ, गाड्या दुरुस्तीचा देखभाल कक्ष, प्रशासकीय इमारत आदींची उभारणी पूर्ण झाली असून आता त्यावर अंतिम हात फिरवणे सुरू आहे.

### एकात्मिक चाचणी व निरीक्षण लवकरच

या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येकी आठ डब्यांच्या नऊ गाड्यांची आवश्यकता होती. यातील नववी गाडी काहिशी विलंबाने दाखल झाली. त्यानंतर मागील महिन्यात या सर्व नऊ गाड्यांची ताशी ९५ किमी वेगाने चाचणी सुरू झाली आहे. गाडी धावत असताना प्रत्येक प्रणालीची सखोल चाचणी घेतली जाते. या चाचणीअंती त्या प्रणालीला स्वतंत्र सुरक्षा तज्ज्ञाकडून प्रमाणपत्र घेतले जाते. या चाचण्यांना एकात्मिक चाचण्या संबोधले जाते. कंपनी स्तरावरील चाचण्या होऊन आता एकात्मिक चाचण्या रेल्वेच्या रिसर्च अँड डिझाइन ऑर्गनायझेशनसमोर (आरडीएसओ) लवकरच होतील. आरडीएसओ चाचणीअंती निरीक्षण करुन गाडीसह सर्व प्रणालीला प्रमाणपत्र देतील. या प्रमाणपत्रानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त येऊन पाहणी करतील व त्यांच्या प्रमाणपत्रानंतर ही मार्गिका दुसऱ्या डेडलाइननंतर तीन महिन्यांनी जुलै महिन्यात व्यावसायिकरित्या सुरु होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



### कारशेडची कामेही पूर्ण

- कारशेडमध्ये वळणदार मार्गिका अत्यावश्यक होती. त्यासाठी अतिरिक्त झाडे कापणीची परवानगीही एमएमआरसीने न्यायालयाकडून आणली होती. गाड्यांची दुरुस्तीपूर्व व दुरुस्तीनंतरच्या चाचणीसाठी ही वळणदार मार्गिका महत्त्वाची आहे. ही मार्गिका उभी करण्याच्या मार्गातच झाडे येत असल्याने ती कापण्यात आली होती.
- या कारशेडच्या विविध कामांसाठी आवश्यक असलेल्या वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र उपकेंद्र या परिसरात उभे होणार आहे. हे उपकेंद्रेही या वळणदार मार्गिकेच्या एका बाजूला असतील. वळणदार मार्गिकेसह ही सर्व कामे जवळपास पूर्ण झाली असून आता गाड्यांच्या चाचणीला हिरवा कंदिल मिळताच मार्गिका सुरू होईल.